**मे. भोर केमिकल्स अँड प्लास्टिक प्रा.लि. यांचा प्रस्तावित कंपोझिट मफन्युफॅक्चरिंग इंटरमीडिएट्स इंडस्ट्री प्लॉट नं. ३, सर्वे नं.६/१/१, विल्होली गाव ता.जि. नाशिक येथे उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्त :**

..........................................................................................................................

मे. भोर केमिकल्स अँड प्लास्टिक प्रा.लि. यांचा प्रस्तावित कंपोझिट मफन्युफॅक्चरिंग इंटरमीडिएट्स इंडस्ट्री प्लॉट नं. ३, सर्वे नं.६/१/१, विल्होली गाव ता.जि. नाशिक येथे उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. जिल्हाधिकारी नाशिक, ता. नाशिक, जि. नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि. २२ मार्च २०२४ रोजी दुपारी १२-०० वाजता पार पडली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई - १२५/ २०२४ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २४०३०१— एफटीएस— ०२३३ दि. ०१/०३/२०२४ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१) मा. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
   जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

२) प्रादेशिक अधिकारी,
   महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - सदस्य
   (सदस्य सचिव म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी,
   महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, - संयोजक
   नाशिक

श्री. अमर दुर्गुळे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत केले. मा. जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. संयोजक यांनी सदर पर्यावरण विषयक सुनावणी बाबतचे महत्व तसेच याबाबत केलेल्या कार्यप्रणालीची माहिती दिली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. अमर दुर्गुळे, संयोजक यांनी असे सांगितले की म.प्र.नि. मंडळास प्रकल्प प्रवर्तक में. भोर केमिकल्स अँड प्लास्टिक प्रा.लि. यांचा प्रस्तावित कंपोझिट मफन्युफॅक्चरिंग इंटरमीडिएट्स इंडस्ट्री प्लॉट नं. ३, सर्वे नं.६/१/१, विल्होली गाव ता.जि. नाशिक प्रकल्प उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदर अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी नाशिक यांनी सदरची सुनावणी दि.२२.०३.२०२४ रोजी दु. १२.०० वाजता घेण्याबाबत निर्देशित केले.

सदर वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांनी स्थानिक वृतपत्र मराठी दैनिक "सकाळ" व दैनिक "टाइम्स ऑफ इंडीया" या इंग्रजी यात दिनांक ०७.१२.२०२३ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पा विषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ — नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मा. जिल्हाधिकारी कार्यालय- नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, नाशिक, उप विभागीय अधिकारी, नाशिक, जिल्हा-नाशिक, तहसील कार्यालय, नाशिक, ग्रामपंचायत कार्यालय- सारुळ, गौळाणे गाव, राजुरबहुला, विल्होळी, आंबेबहुला, पाथर्डी, चुंचाळे, ता.व जि. नाशिक. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते.

उप-प्रादेशिक अधिकारी तथा संयोजक, यांनी सांगितले की, उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात.

सदरहू सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी पर्यावरण व वातावरणीय मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सदर सुनावणी सुरु करणेस परवानगी दिली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबद्दल विविध मुदयांवर जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदय:स्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी बाबत सादरीकरण केले.

तद्नंतर मा. अध्यक्षांनी सदर प्रकल्पाच्या अनुषंगाणे लोकांना काही टिका टिप्पणी, निवेदण, आक्षेप किंवा त्यांचे काही पर्यावरणाच्या अनुषंगाणे म्हणने असेल ते मांडण्यास सांगितले.

सदर सुनावणी दरम्यान खालीलप्रमाणे मुददे उपस्थित करण्यात आले.

| अ.क्रं | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी | उद्योगाच्या प्रतिनिधीने दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १. | प्रशांत अशोक देशमुख, माजी उपसरपंच आंबे बहुला- आपला हा प्रकल्प केमिकल केमिकल झोन मध्ये आहे का ? स्थानिक लोकांना रोजगार मिळणार का ? | प्रकल्प प्रवर्तक डॉ. मिलिंद खांडवे यांनी असे सांगीतले की- सदर प्रकल्पात जे केमिकल्स् बनविले जाणार आहे ते कार्बन फायबर्स फॅब्रिक्स् म्हणजे रॉकेटरी चंद्रयान, मिसाईल, टेक्नॉलजी यात लागणारे इंटरमेडिएट त्यांचा बेस येथे बनविला जाणार आहे. याचा वापर डिफेन्स्, सौरक्षण क्षेत्रात होतो. हे नॅचरल पेन्ट व दुसऱ्या इंडस्ट्रि मध्ये बघतात तशे केमिकल नसुन यासाठी लागणारे केमिकल्स् त्याचे रिसर्च आणि डेवलपमेंट आधी होणार. सदरचे केमिकल्स् व वॉटर बेस मटेरीअल वापरण्यावर आमचा भर आहे.<br><br>सध्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पात स्थानिक लोक काम करत आहेत. आणि या पुढे पण या प्रकल्पासाठी जर या क्षेत्रातील शिक्षित लोक मिळाले किंवा नाही मिळाले |

| | | |
|---|---|---|
| | | तर आम्ही त्यांना बेसीक इनहाऊस ट्रेनिंग देतो. स्थानिक लोकांना रोजगार देऊ हा आमचा निश्चय ठरलेला आहे. |
| २. | अमोल वाघ, गाव- विल्होळी -हवा व ध्वणी प्रदुषणाबाबत कंपनी काही काळजी घेणार आहे का ? | प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी प्रकल्पामध्ये बॉईलर किंवा धुळ व वायू प्रदुषण होईल असे कोणतेही मशिन्स् बसवण्यात येणार नसल्याने हवा प्रदुषण होणार नाही. तसेच अंतर्गत भागात कॉक्रेटीकरण रस्ते केल्याने त्यामुळे हवा प्रदुषण होणार नाही. तसेच उद्योगाच्या सभोवताली संरक्षक भिंत उभारली जाईल व झाडे लावली जातील त्यामुळे ध्वणीची पातळी मर्यादित राहिल. |
| ३. | मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी असे विचारले की, प्रकल्पामध्ये साडे सहा लाख रूपये आपण CSR राखवून ठेवलेले आहेत त्यांचे नियोजन कसे करणार आहात? प्रकल्प परिसरात करणार आहात की इतर ठिकाणी त्याचा वापर होतो ? | प्रकल्पधारकाने जो निधी पर्यावरण संवर्धणासाठी राखवून ठेवला आहे त्याचा वापर हा मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धनासाठी वापरण्यात येईल. जसे की, नागरी सांडपाणी प्रक्रीया संयंत्रणा उभारणी व नागरी घणकचरा व्यवस्थापन, वृक्ष संवर्धन, इत्यादीसाठी करण्यात येईल. |
| ४. | उप-प्रादेशिक अधिकारी सदर प्रकल्पात Solvent मुळे वास (व्ही. ओ. सी) येण्याची शक्यता आहे तर त्या अनुषंगाणे प्रकल्पधारक काय उपाय-योजना करणार आहेत ? | प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सदर प्रकल्पामध्ये खुप कमी प्रमाणात Solvent चा वापर केला जाणार आहे. त्यामुळे हवा प्रदुषण होणार नाही.<br>सदर प्रकल्पात वापरल्या जाणारा Epoxy resin हा वॉटर बेस Epoxy resin आहे त्यामुळे यात VOC चा प्रश्नच येत नाही. आणि दुसरे पॉलिमर मध्ये सॉलवंटचा वापर हा अत्यंत कमी प्रमाणात होणार आहे. कंडेंसर मधून जो वायु निघेल तो कलेक्शन टैंक मध्ये घेतला जाईल.<br>तसेच केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून मान्यता प्राप्त लॅब कडून हवेची गुणवत्ता वेळो वेळी तपासली जाईल व योग्य त्या उपाय-योजना करण्यात येतील. |
| ५. | उप-प्रादेशिक अधिकारी- प्रकल्पात सध्या पाण्याचा उपयोग व भविष्यात | प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सदर प्रकल्पात सध्या २० घन मीटर/दिन इतका पाण्याचा वापर केला जाईल सदर पाणी हे टँकर मार्फत घेतले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | किती पाण्याचा किती प्रमाण आहे व त्याचे स्त्रोत कोणते आहे? | |
| ६. | प्रादेशिक अधिकारी, नाशिक तथा मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ यांचे प्रतिनिधी यांनी असे विचारले की, CGWA परवाणगी घेतलेली आहे का? | प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सदर प्रकल्पात पाण्यासाठी वापरल्या जाणारे टँकरधारकाकडे CGWA ची परवानगी घेतली आहे का याची तपासणी करूणच पाण्याचा वापर करण्यात येईल. |

सदर जाहीर लोक सुनावणीचे संयोजक यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात परंतु कोणीही मुददा उपस्थित केला नाही. तसेच या कार्यालयाकडे लेखीस्वरूपात कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. त्यांनी पुढे नमुद केले की, सदर जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने पुढे पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांच्या संमतीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**( अमर दुर्गुळे )**
**संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि मंडळ, नाशिक**

**(लिंबाजी सु. भड)**
**सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि. मंडळ, नाशिक**

**(जलज शर्मा भाप्रसे)**
**अध्यक्ष तथा**
**मा. जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**